**पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण**

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण विसर्जित करुन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये विलीन करणेबाबत तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त करणेबाबत - **महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार अधिसूचना**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग,**
**चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मुंबई - ४०० ०३२.**
**शासन अधिसुचना क्र.टिपीएस-१८२१/२२१/प्र.क्र.४३/२०२१/नवि-१३,**
**दिनांक : ०७.०६.२०२१**

**शासन निर्णय :-** सोबतची शासकीय **अधिसूचना** महाराष्ट्र शासन **असाधारण** राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात यावी.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,*

Bhushan Ashok Gagrani

Digitally signed by Bhushan Ashok Gagrani
DN: CN = Bhushan Ashok Gagrani, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2021.06.07 18:08:29 +05'30'

**( भूषण गगराणी )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा.उप मुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा.मंत्री (नगर विकास) महोदय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा.राज्यमंत्री (नगर विकास) महोदय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

६) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

७) मा.उप सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

८) मा.उपाध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

९) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

११) संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति,**

१. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

/- सदरची **अधिसूचना** संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

२. सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

३. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.

४. जिल्हाधिकारी, पुणे.

५. महानगर आयुक्त, तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

/- सदर अधिसूचनेतील मंजूर प्रस्तावानुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांना नियुक्त करण्यात आलेल्या विशेष नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्राच्या हद्दी दर्शविणारे नकाशे अधिप्रमाणित करण्यासाठी ५ प्रतींमध्ये शासनास सत्वर सादर करावेत.

६. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी.

७. मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे.

८. सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.

९. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे.

/-सोबतची शासकीय **अधिसूचना** महाराष्ट्र शासन **असाधारण** राजपत्रामध्ये प्रसिध्द करुन तिच्या प्रत्येकी १० प्रती या विभागास व उपरोक्त कार्यालयांना पाठवाव्यात.

१०. कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदर **अधिसूचना** विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

११. कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदर **अधिसूचना** शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१२. निवडनस्ती (नवि-१३).

*********

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**

**चौथा मजला, मुख्य इमारत,**

**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

## अधिसूचना

**दिनांक - ०७.०६.२०२१.**

***महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.***

**क्र.टिपीएस-१८२१/२२१/प्र.क्र.४३/२०२१/नवि-१३ :-** ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७) (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) चे कलम ११३(१) अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र.आरपीपी-११७०/ १६३१९/आरपीसी-एक, दि.१४.०३.१९७२ अन्वये, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र, पिंपरी-चिंचवड नवनगराकरिता निर्देशित केले आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नवनगर क्षेत्र" असा करण्यात आला आहे) तसेच उक्त नवनगर क्षेत्रातील जागा संपादित आणि विकसित करुन, त्या निर्गत करण्यासाठी, उक्त अधिनियमाच्या कलम ११३(२) व ११३(७) नुसार अधिसूचना क्र.आरपीपी-११७०/१६३१९/आरपीसी-दोन, दि.१४.०३.१९७२ अन्वये, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नवनगर विकास प्राधिकरण" असा करण्यात आला आहे) गठीत केले आहे;

आणि ज्याअर्थी, शासन अधिसूचना क्र.पीसीएन-१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, दि.१५.११.१९९७ अन्वये पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या नियोजन नियंत्रणाखालील काही क्षेत्र पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली वर्ग करण्यात आले आहे. तसेच उक्त अधिनियमाचे कलम ११३(८) सह कलम १५४(१) अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन, शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१८१९/प्र.क्र.१६७/१९/ नवि-१३, दि.१३.०३.२०१९ अन्वये उक्त नवनगर विकास प्राधिकरणाच्या मालकीच्या जागा, ज्यावर उक्त प्राधिकरण स्वत: विकास करणार आहे, असे क्षेत्र वगळता उर्वरित क्षेत्राकरिता पिंपरी-चिंचवड महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत राहील, असे निदेश देण्यात आले आहेत;

आणि ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-त मधील खंड-ग आणि महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९९ चे कलम २(ग) मधील तरतुदीनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग अधिसूचना क्र.टिपीएस-१८९९/११९१/ प्र.क्र.८०/९९/नवि-१३, दि.२३.०७.१९९९ अन्वये, पुणे शहरासभोवतालचे काही क्षेत्र भारतीय संविधानाच्या भाग-९-अ च्या प्रयोजनार्थ "पुणे महानगर प्रदेश" म्हणून घोषित केले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र.टिपीएस-१८१५/१२०४/१३/प्र.क्र.८७/१५/ नवि-१३, दि.३१.०३.२०१५ अन्वये उक्त अधिनियमाचे कलम ४२क, ४२ग व ४२च अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन पुणे महानगर क्षेत्रास, पुणे महानगर प्रदेश विकास क्षेत्र म्हणून उक्त अधिनियमाचे कलम ४२क नुसार घोषित करुन कलम ४२ग नुसार या घोषित क्षेत्रासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त क्षेत्र विकास प्राधिकरण" असा करण्यात आला आहे) गठीत केले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने दि.०४.१२.२०१५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे, पुणे महानगर प्रदेश क्षेत्राची हद्द वाढवून सुधारित हद्दवाढ घोषित केली आहे. तसेच दि.१०.०२.२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे, पुणे महानगर प्रदेश क्षेत्राची आणखी हद्द वाढवून सुधारित हद्दवाढ घोषित केली आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त महानगर क्षेत्र" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांनी, महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) (तरतूदी पुढे चालू ठेवणे) अधिनियम, १९९९ (सन २००० चा महा. अधि. क्र.५) च्या कलम २ च्या खंड-(क) अन्वये महानगर क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या विवक्षित क्षेत्रांच्या उचित, सुव्यवस्थित व शीघ्र विकासाचे समन्वयन व पर्यवेक्षण करण्याच्या आणि अशा विकासाच्या योजना, प्रकल्प व परियोजना यांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ, अशा प्रदेशातील क्षेत्राकरिता प्राधिकरणे स्थापन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबीसाठी तरतूद करण्याकरीता महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश, २०१६ (सन २०१६ चा महा.अध्या. क्र.११) दि.१३.०६.२०१६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अध्यादेश" असा करण्यात आला आहे) प्रख्यापित केला असून यानंतर तो महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३) मध्ये परिवर्तीत झाला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे कलम ३ चे उपकलम (१) आणि उक्त अधिनियमाचे कलम ४२क, ४२ग, ४२च अन्वये प्रदान अधिकारांचा वापर करुन शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र.पीआरडी-३३१६/प्र.क्र.५४/नवि-७, दि.११.०७.२०१६ अन्वये उक्त महानगर क्षेत्रासाठी, विशेष करुन त्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या क्षेत्राकरीता, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्रदेश विकास प्राधिकरण" असा करण्यात आला आहे) आणि उपरोक्त दि.३१.०३.२०१५, दि.०४.१२.२०१५ व दि.१०.०२.२०१६ रोजीच्या अधिसूचना विखंडीत करण्यात आल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगर क्षेत्राचा उचित, सुव्यवस्थित विकास होण्यासाठी, उक्त अधिनियमाचे कलम ४०(१)(घ) अन्वये व त्या अनुषंगाने प्राप्त इतर अधिकारांचा वापर करुन शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र.टिपीएस-१८१७/प्र.क्र.१७३/१७/नवि-१३, दि.१८.०१.२०१८ अन्वये, त्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकरीता अधिसूचित क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करण्यात आले असून या अधिसूचित क्षेत्रासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची, त्याच्या स्थापनेपासून म्हणजेच दि.३१.०३.२०१५ पासून विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रदेश विकास प्राधिकरणाने दि.१७.१२.२०२० रोजीच्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे, उक्त नवनगर विकास प्राधिकरण विसर्जित करुन, उक्त प्रदेश विकास प्राधिकरणात विलिन करण्याचा प्रस्ताव पत्र क्र.४७, दि.०२.०२.२०२१ अन्वये शासनास सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशीनंतर, उक्त नवनगर विकास प्राधिकरण विसर्जित करुन, उक्त प्रदेश विकास प्राधिकरणात विलीन करणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, राज्य मंत्रिमंडळाने दि.०५.०५.२०२१ रोजीच्या बैठकीत विषय क्र.१० अन्वये, उक्त नवनगर विकास प्राधिकरण विसर्जित करुन, उक्त प्रदेश विकास प्राधिकरणात विलिन करण्याच्या प्रस्तावास सशर्त मान्यता दिलेली आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ४०(१ब) तसेच कलम १६० व कलम १६१ अन्वये प्राप्त अधिकारांचा उपयोग करुन राज्य शासन याद्वारे असे घोषित करीत आहे की -

" पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण हे, सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून विसर्जित करण्यात येत असून या दिनांकापासून या नवीन नगराच्या संबंधात उक्त नवनगर विकास प्राधिकरणाचे कार्य बंद करण्यात येत आहे. "

प्रस्तुत प्रस्तावाचे अनुषंगिक अटी / मुद्दे खालीलप्रमाणे असतील. -

१) पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या सर्व चल, अचल मालमत्ता व दायित्वे राज्य शासनामार्फत नगर विकास विभागाच्या अखत्यारीत येतील आणि त्यानंतर अशा मालमत्ता व दायित्वे, उक्त अधिनियमाच्या कलम १६१ अन्वये प्राप्त अधिकारांनुसार, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे निहीत होतील.

२) उक्त अधिनियमाच्या कलम १६१ अन्वये प्राप्त अधिकारांनुसार, राज्य शासनातर्फे मालमत्ता, निधी व देय रकमा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे निहीत करण्यात येत आहेत व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने भाडेपट्टयाने दिलेले व विकसित झालेले भुखंड, सार्वजनिक सुविधांच्या आरक्षणाखालील भुखंड व ज्यावर अतिक्रमण झालेले आहे असे भुखंड यांची मालकी व ताबा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस सुपूर्द करण्यात येत आहे. यानुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होणाऱ्या मालमत्तांच्या संबंधातील दायित्वे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे वर्ग होतील. चिंचवड येथे शासकीय विश्रामगृहाकरीता सुमारे २.५ एकर ते ३.० एकर क्षेत्राचा भूखंड रु.१/- नाममात्र दराने शासनाकडे हस्तांतरीत करावा, जो तात्पुरता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ताब्यात असेल.

३) उक्त नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील पेठ क्र.५ व ८-पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व परिषद (Convention) केंद्र, पेठ क्र.९, ११, १२ आणि भोसरी मध्यवर्ती सुविधा केंद्र याचे एकूण क्षेत्र ३७५.८९ हेक्टर असून यापैकी विविध प्रयोजनाच्या वाटपास / विकासास उपलब्ध क्षेत्र २२३.८९ हेक्टर क्षेत्र एकसंघ आहे. उक्त ३७५.९० हेक्टर या संपूर्ण क्षेत्राकरीता, उक्त अधिनियमाचे कलम ४०(१ब) नुसार, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. उक्त अधिनियमाचे कलम ४०(५) नुसार, विशेष नियोजन प्राधिकरणाने सादर

केलेले प्रस्ताव शासन उक्त अधिनियमाचे कलम ११५ अन्वये मंजूर करीत नाही, तोपर्यंत पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव कायम राहतील.

४) उक्त मुद्दा क्र.३ मधील नमूद क्षेत्र वगळता, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे अधिकार/ नियंत्रण क्षेत्राखालील उर्वरित सर्व क्षेत्राकरीता, उक्त अधिनियमाचे कलम ४०(१ब) नुसार, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. उक्त अधिनियमाचे कलम ४०(५) नुसार, विशेष नियोजन प्राधिकरणाने सादर केलेले प्रस्ताव शासन उक्त अधिनियमाचे कलम ११५ अन्वये मंजूर करीत नाही, तोपर्यंत पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव कायम राहतील.

५) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्राकरिता आता एकत्रिकृत विकास व नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली ही एकच नियमावली लागु झाली आहे. त्यामुळे प्रिमियम चटई क्षेत्र निर्देशांक / टी.डी.आर.सह एकूण बांधकाम क्षमता एकसमान अनुज्ञेय होणार आहे. यामध्ये तसेच एकूण बांधकाम क्षमतेमध्ये आता तफावत राहणार नाही. अशा परिस्थितीत चटई क्षेत्र निर्देशांकातील फरकाकरिता तसेच प्रिमियम चटई क्षेत्र निर्देशांक / टी.डी.आर. अनुज्ञेय करण्याकरिता पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही.

६) उक्त मुद्दा क्र.१ व २ मधील बाबी पहाता, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या Land Disposal Policy नुसार Lease Rent, अतिरिक्त अधिमूल्य इ. सर्व शुल्कांची वसुली करणेचे अधिकार तसेच न्यायालयीन दाव्यांचे दायित्व, तसेच १२.५% परताव्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार, उक्त अधिनियमाचे कलम १६१ नुसार, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका याच्याकडे निहीत होणाऱ्या मालमत्तांच्या बाबतीत अनुक्रमे, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांचेकडे राहतील.

७) पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची कार्यालये, व्यापारी इमारत, रहिवासी इमारत, रोख / ठेव आणि इतर गुंतवणूक ही पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात यावी. पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने विकसित करुन भाड्याने दिलेले भूखंड व सुविधा भूखंड, जे अगोदरच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे व्यवस्थापनासाठी हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत, ते सर्व पिंपरी-चिंचवड महानगरपालिककडे व इतर सर्व मालमत्ता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरीत होतील.

८) पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणातील कर्मचारी हे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग होतील. तथापि, प्रतिनियुक्तीवर असलेले कर्मचारी हे त्या त्या विभागाला परत पाठविले जातील. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आवश्यकतेप्रमाणे त्यांच्या सेवा पुनर्प्राप्त करुन घेऊ शकतील. मात्र हस्तांतरणाचे काम सुलभ होण्याकरीता प्रतिनियुक्तीवरील अधिकारी पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण विसर्जित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांकरीता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडेच कार्यरत राहतील व त्यांचा खर्च पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येईल. पुणे महानगर

प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग होणाऱ्या पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सेवेबाबत, त्यांचे Terms, Emoluments इत्यादी संरक्षण करणे आवश्यक राहील व अनुच्छुक कर्मचाऱ्यांसाठी VRS इत्यादी पर्याय उपलब्ध करुन द्यावेत.

९) पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये विलिनीकरणाशी निगडीत पुढील कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

उक्त क्षेत्रांच्या सिमा दर्शविणारे नकाशे नागरिकांच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

१) महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

२) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, जि. पुणे.

३) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

४) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.

प्रस्तुत अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,*

Bhushan Ashok Gagrani

Digitally signed by Bhushan Ashok Gagrani
DN: CN = Bhushan Ashok Gagrani, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2021.06.07 18:08:52 +05'30'

**( भूषण गगराणी )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

**Urban Development Department**
**Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,**
**Mantralaya, Mumbai – 400 032.**

## NOTIFICATION

**Dated - 07/06/2021.**

***Maharashtra Regional and Town Planning Act, 1966***

**No.TPS-1821/221/CR-43/2021/UD-13 :-** Whereas, the Government of Maharshtra in Urban Develoment Department, in exercise of the powers conferred by section 113(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") vide Notification No.RPP-1170/16319/RPC-I, dated 14.03.1972, has designated certain area, as specifically described in the Schedule appended to this notification, as site for the the Pimpri-Chinchwad New Town Development Authority (hereinafter referred to as "the said New Town Area") and for acquiring, developing and disposing of lands in the said New Town Area, the Pimpri-Chinchwad New Town Development Authority (hereinafter referred to as "the said New Town Development Authority") has been constituted under section 113(2) of the said Act vide Notification No.RPP-1170/16319/ RPC-II, dated 14.03.1972;

And whereas, vide Governement Notification No.PCN-1697/934/CR-89/UD-22, dated 15.11.1997, some area under the planning control of Pimpri-Chichwad New Town Development Authority has been brought under the planning control of Pimpri-Chichwad Municipal Corporation. Also, in exercise of the powers conferred by section 113(8) with section 154(1) of the said Act, directives has been issued vide Governement Notification No.TPS-1819/CR.167/19/UD-13, dated 13/03/2019 that, except lands owned by the said New Town Development Authority, which are to developed by the said authority, Pimpri-Chichwad Municipal Corporation will exercise the powers of the Planning Authority for remaining area;

And whereas, in exercise of the powers conferred by clause (c) of the Article 243-P of the Constitution of India and by clause (c) of section 2 of the Maharashtra Metropolitan Planning Committee (Constitution and Functions) Act, 1999, the Government of Maharshtra in Urban Develoment Department vide Notification No.TPS-1899/1191/CR-80/ 99/UD-13, dated 23.07.1999, declared some area around Pune City, as the "Pune Metropolitan Area" for the purpose of Part IX-A of the Constitution of India;

And whereas, in exercise of the powers conferred by sections 41A, 42C and 42F of the said Act, the Government of Maharshtra vide Notification No.TPS-1815/1204/13/CR-87/15/UD-13, dated 31.03.2015 declared the Pune Metropolitan Area as a "Pune Metropolitan Region Development Area, under section 42A of the said Act and thereof constituted "Pune Metropolitan Area Region Development Authority" (hereinafter referred to as "the said Area Development Authority"), for this declared area;

And whereas, Government of Maharashtra vide Notification dated 04/12/2015, has extended the limits and revised the limits of Pune Metroplitan Region Area. Also, vide Notification dated 10/02/2016, Government has further extended the limits and revised the limits of Pune Metroplitan Region Area (hereinafter referred to as “the said Metropolitan Area”);

And whereas, the Government of Maharshtra has promulgated the Maharashtra Metropolitan Region Development Authority Ordinance, 2016 (Mah. Ord. XI of 2016) (hereinafter referred to as “the said Ordinance”) on 13.06.2016, to provide for establishment of the Authorities for certain areas declared as Metropolitan Areas under clause (c) of section 2 of the Maharashtra Metropolitan Planning Committees (Constitute and Functions) (Continuatioin of Provisions) Act, 1999 (Mah. V of 2000), for the purpose of co-ordinating and supervising the proper orderly and rapid development of the said area in such regions and of executing projects and schemes for such development, and to provide for connected therewith or incidental thereto; which is thereafter converted into the Maharashtra Metropolitan Region Development Authority Act, 2016 (Mah. Act 3 of 2017);

And whereas, in exercise of the powers conferred by sub-section (1) of section 3 of the said Ordinance and Section 42-A, 42-C, 42-F, of the said act, vide Government in Urban Development Department Notification No.PRD-3316/CR-54/UD-7, dated 11.07.2016, Pune Metropolitan Region Development Authority has been established for the said Metropolitan Area, more specifically described in the Schedule appended thereto (hereinafter referred to as “the said Region Development Authority”) and above mentioned notifications dated 31.03.2015, dated 04/12/2015 & dated 10/02/2016 has been rescinded;

And whereas, for proper and well planned development of the said Metropolitan Area, in exercise of the powers conferred by section-40(1)(d) of the said act, the Government in Urban Development Department, vide Notification No.TPS-1817/CR-173/ 17/UD-13, dated 18.01.2018, has specified the area, more specifically described in the Schedule appended thereto, to be the “Notified Area” for Pune Metropolitan Region Development Authority and appointed Pune Metropolitan Region Development Authority as Special Planning Authority for such notified area from the date of its establishment i.e. 31/03/2015;

And whereas, as decided in the meeting dated 17/12/2020, the said Region Development Authority has submmited the proposal vide letter No.47, dated 02/02/2021 to the Government, to desolve the said New Town Development Authority and to merge in the said Region Development Authority;

And whereas, after necessary enquries, the Governement is of opinion that, the said New Town Development Authority should be desolved and should be merged in the said Region Development Authority;

And whereas, the State Cabinet in the meeting dated 05/05/2021 vide Subject No.10 has decided to desolve the said New Town Development Authority and merge in the said Region Development Authority, on certain conditions;

Now therefore, in exercise of the powers conferred by section 40(1B) and section 160 & section 161 of the said Act, the Government of Maharashtra hereby declares that -

"Pimpri-Chichwad New Town Development Authority is dissolved from date of publication of this notification in the official gazzette and ceased to function from this date, in relation to area of the new town.

The conditions / points, regarding this proposal are as below –

1) All movable and immovable properties and liabilities of the Pimpri-Chichwad New Town Development Authority will vest in the state government through Urban Development Department and thereafter such properties and liabilities will be vested in to the Pune Metropolitan Region Developmnet Authority as well as Pimpri-Chichwad Municipal Corporation, as per the provisions of section 161 of the said Act.

2) As per the provisions of the section 161 of the said Act, properties, funds and dues are vested in with Pune Metropolitan Region Developmnet Authority and ownership and possession of the plots leased out by Pimpri-Chichwad New Town Development Authority and developed plots, plots under public amenities reservations and encroached plots in Pimpri-Chinchwad Municipal limits, is transffred to Pimpri-Chinchwad Municipal Corporation. The liabilities in respect of the properties, which will be transferred to Pune Metropolitan Region Developmnet Authority and Pimpri-Chichwad Municipal Corporation, will be transferred to the Pune Metropolitan Region Developmnet Authority and Pimpri-Chichwad Municipal Corporation, respectively. The plot for Government Rest House, admeasuring about 2.5 acre to 3.0 acre at Chinchwad is to be transferred to the Government at nominal cost of Rs.1/-, which will be temporarily in the possession of the Pune Metropolitan Region Developmnet Authority.

3) Total area of Sector No.5 & 8-Pune International Exhibition & Convention Centre, Sector No.9, 11, 12 and Bhosari Central District Centre, in the said New Town Development Authority is 375.90 Ha., out of which contiguous area available for allotment / development for various purposes is 223.89 Ha. The Pune Metropolitan Region Development Authority is being appointed as Special Planning Authority, under section 40(1B) of the said Act, for the entire area of 375.90 Ha. As per the provisions of section 40(5) of the said Act, the propsals of the sanctioned Development Plan of the Pimpri-Chinchwad New Town Developmnet Authority will remain in force till the proposals submitted by the Special Planning Authority are sanctioned by the Government under section 115 of the said Act.

4) The Pimpri-Chinchwad Municipal Corporation is being appointed as Special Planning Authority, under section 40(1B) of the said Act, for the remaining area, excluding the areas mentioned in point No.3 above, under jurisdiction / planning control of the Pimpri-Chinchwad New Town Development Authority. As per the provisions of section 40(5) of the said Act, the propsals of the sanctioned Development Plan of the Pimpri-Chinchwad New Town Developmnet Authority will remain in force till the

proposals submitted by the Special Planning Authority are sanctioned by the Government, under section 115 of the said Act.

5) Now Unified Development Control and Promotion Regulations is in force for Pimpri-Chichwad Municipal Corporation and the Pimpi-Chichwad New Town Development Authority. So the total building potential including premium FSI / TDR will be uniformly permmissible. There will be no disparity in the same and also in building potential. In this situation, there will be no need for the Pimpri-Chinchwad Municipal Corporation to obtain No Objection Certificate from the Pune Metroplitan Region Development Authority for difference in FSI and to allow premium FSI / TDR.

6) Considering the points No.1 & 2 above, as per the Land Disposal Policy of the Pimpri-Chinchwad New Town Development Authority, the powers to recover the lease rent, all charges like additional premium etc. and liabilities of judiciary claim and also to take action on 12.5% land return policy, are entrusted to Pune Metroplitan Region Development Authority and Pimpri-Chinchwad Municipal Corporation respectively, for the properties transferred to Pune Metroplitan Region Development Authority and Pimpri-Chinchwad Municipal Corporation, under section 161 of the said Act.

7) The offices, merchantile buildings, residential buildings, cash / deposits and other investments of Pimpri-Chinchwad New Town Development Authority should be transferred to Pune Metropolitan Region Developmnet Authority. The plots developed and alloted by Pimpri-Chinchwad New Town Development Authority and amenity plots, which are already transferred to Pimpri-Chichwad Municipal Corporation for management, all should be transferred to Pimpri-Chinchwad Municipal Corporation and all other properties should be transferrd to Pune Metropolitan Region Developmnet Authority.

8) The employees of Pimpri-Chinchwad New Town Development Authority will be transferred to Pune Metropolitan Region Developmnet Authority. But, the employees on deputation will be sent to their respective departments. The Pune Metropolitan Region Developmnet Authority and Pimpri-Chinchwad Municipal Corporation can avail their services back as per their requirements. Notwithstanding this, for easy operation of the transfer, the officers on deputation will continue to work with Pune Metropolitan Region Developmnet Authority for six months from date of dissolution of Pimpri-Chichwad New Town Development Authority and all expenses will be borne by the Pune Metropolitan Region Developmnet Authority. Regarding services of the employees of Pimpri-Chinchwad New Town Development Authority, which are transferred to Pune Metropolitan Region Developmnet Authority, it will be necessary to secure their terms, emoluments etc. and for unwilling employees, VRS option should be made available.

9) The Motropolitan Commissioner, Pune Metropolitan Region Developmnet Authority is authorized to take further action in relation to the merger of Pimpri-Chinchwad New Town Development Authority with Pune Metropolitan Region Developmnet Authority.

The Plans showing boundaries of the above areas are kept open for inspection by the Public at the following offices in office time on all working days

1) The Metropolitan Commissioner, Pune Metropolitan Regiona Development Authority, Pune.

2) The Commissioner, Pimpri-Chinchwad Municipal Corporation, Pimpri, Pune.

3) The Joint Director of Town Planning, Pune Division, Pune.

4) Assistant Director of Town Planning, Pune Branch, Pune.

This Notification is made available on the Government of Maharashtra website www.maharashtra.gov.in (Acts/Rules)

*By order and in the mname of the Governor of Maharashtra,*

Bhushan Ashok Gagrani

Digitally signed by Bhushan Ashok Gagrani
DN: CN = Bhushan Ashok Gagrani, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2021.06.07 18:09:12 +05'30'

**( Bhushan Gagarani )**
**Principal Secretary, Govt. of Maharashtra**